महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २२२ वा | दिनांक : २९/०६/२०२५ | वार : रविवार

## हिंदी सक्तीचा जीआर मागे घेईपर्यंत आंदोलन सुरूच राहणार : आदित्य ठाकरे



**मुंबई :** राज्यात पहिलीपासून हिंदी भाषा सक्तीच्या मुद्द्यावरून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. याच पार्श्वभूमीवर युवासेना प्रमुख आणि आमदार आदित्य ठाकरे यांनी आज पत्रकार परिषद घेत सत्ताधाऱ्यांवर जोरदार हल्लाबोल केला. त्यांनी हिंदी सक्तीचा निर्णय भाजप सरकारचा असल्याचे सांगत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे या दोघांवर निशाणा साधला. हिंदी सक्तीचा जीआर मागे घेईपर्यंत आमचे आंदोलन सुरूच राहिल, असा इशाराही आदित्य ठाकरे यांनी सरकारला दिला आहे.

आम्ही सक्तीचा जीआर काढला होता का? आम्ही प्रत्येक शाळेत मराठी भाषेची सक्ती केली होती. हिंदी भाषा लादण्याचे किंवा तिसरी भाषा लादण्याचे काम भाजपवाल्यांनी केले आहे, असा आरोप आदित्य ठाकरे यांनी केला.

गेल्या तीन वर्षांत दोन मुख्यमंत्री वेगळे झालेत. ते सरकारमध्ये स्वत: बसलेत. पण आरोप आमच्यावर करत आहेत. नशीब ते नेहरूंवर पोहोचले नाहीत, असे म्हणत आदित्य ठाकरे यांनी एकनाथ शिंदेंना टोला लगावला आहे. भाजपमध्येही अंतर्गत वाद आहेत, ते आपल्याला दिसत आहेत. दुसरे कोणी असे मंत्री आहेत का, ज्यांना फडणवीसांची जागा पाहिजे? हे ही असू शकते. सक्तीच्या जीआरची तारीख काय आहे? तो परवा काढला आहे. हे लोक कोणत्या धुंदीत आहेत? झोपेत आहेत का? हिंदीच्या सक्तीचा जीआर हा भाजपच्या सरकाने काढलेला आहे. भ्रष्टनाथ शिंदेंच्या मंत्र्यांनी काढलेला आहे. शिंदेंनाच फडणवीसांना अडचणीत आणायचे नाही ना? हा देखील विचार करा, असे आदित्य ठाकरे म्हणाले.

देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या सरकारमध्ये कोण विरोधात काम करतंय हे ओळखावे. आपण सगळे भारतीय आहोच. पहिलीच्या विद्यार्थ्यांवर तिसरी भाषा खरोखरच लादणार आहात का? याचा थोडा स्वार्थाचे राजकारण बाजुला ठेवून विचार करावा, असा सल्ला आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिला.

हिंदी सक्तीचा जीआर जोपर्यंत मागे घेतला जात नाही, तोपर्यंत उद्याचे आणि ५ जुलैचे आंदोलन चालूच राहिल. आमचा विरोध भाषेला किंवा भाषिकाला नाही. तुम्ही पहिलीच्या विद्यार्थ्यांवर हिंदी लादत आहात, महाराष्ट्रात सक्ती करत आहात, त्याला आमचा विरोध आहे, असे आदित्य ठाकरे म्हणाले. सरकारमध्ये जी गडबड चालू आहे, त्याविरोधात आम्ही विरोधीपक्ष म्हणून उतरलो आहोत. आमच्यावर कोणतीही भाषा आम्ही लादू देणार नाही, असा इशाराही आदित्य ठाकरे यांनी सरकारला दिला.

महाराष्ट्रात जवळपास २५ लाख विद्यार्थ्यांचे हाल होत आहेत. १३ मे रोजी दहावीचा निकाल लागला होता. १३ मे पासून आतापर्यंत प्रवेशाची ऑनलाइन प्रक्रिया सुरू केली, त्यामध्ये पुढे कसे जायचे? याबद्दल कोणाला काहीच माहिती नाही. ऑनलाइन फॉर्ममध्ये गडबडी आहे, ओटीपी येण्यामध्ये अडचणी येत आहेत. वेबसाइट देखील कोलमडली. ११ वी प्रवेशाची यादी लागली नाही, तर युवासेना शांत बसणार नाही, असा इशाराही आमदार आदित्य ठाकरे यांनी दिला.

## नागपुरातील कार्यक्रमात महायुतीतील श्रेयवादाचा कलगीतुरा : संजय शिरसाटांचा फडणवीसांना टोला

**नागपूर :** महायुतीतील पक्षांमध्ये श्रेयवादावरून सततच खसखस सुरू असते. वेळ मिळताच एकमेकांवर टोलवाटोलवी केली जाते. असाच एक प्रसंग शनिवारी नागपुरात एका कार्यक्रमात पाहायला मिळाला. यावेळी भाषण करताना शिवसेनेचे मंत्री संजय शिरसाट आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात व्यासपीठावरून अप्रत्यक्ष शाब्दिक चकमक रंगली. निधी माझ्या विभागाने दिला, पण श्रेय विदर्भातील नेत्यांना मिळत आहे. त्यामुळे श्रेयवाद कसा करायचा हे आपण शिकलो, अशा शब्दांत संजय शिरसाट यांनी टोलेबाजी केली.

नागपुरातील विधी महाविद्यालयात संविधान उद्देशिका पार्कचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या हस्ते उद्घाटन पार पडले. विशेष म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याच विधी महाविद्यालयातून शिक्षण घेतले आहे. या कार्यक्रमासाठी व्यासपीठावर येण्यापूर्वी सर्व नेते आणि मान्यवर विधी महाविद्यालयातील एका रूममध्ये बसले होते. रूममध्ये घडलेला किस्सा संजय शिरसाट यांनी आपल्या भाषणात सांगितला.

संजय शिरसाटांनी आपल्या भाषणात थेट फडणवीसांवर लक्ष्य साधत एक मजेशीर पण बोचरा टोला लगावला. ते म्हणाले, मुख्यमंत्री फडणवीस कार्यक्रमा आधी आम्ही बसलेल्या खोलीत आले आणि म्हणाले की, ही खोली आता पाडणार आहोत. मग मला वाटले की त्यांनी आपल्यानंतर इथे दुसरे काही निर्माणच होऊ नये असे वाटतंय काय?

पण एवढ्यावरच शिरसाट थांबले नाहीत. त्यांनी पुढे सांगितले, इथल्या कामासाठी माझ्या विभागाने ही निधी दिला, मात्र सर्वजण बावनकुळेंचे कौतुक करत आहे. इथे सर्व विदर्भातील नेते असून ते एकोप्याने वागले. त्यामुळे श्रेयवाद कसा घ्यायचा आपण इथे शिकलो, अशी कोपरखळी संजय शिरसाट यांनी लगावली.

काही वेळाने फडणवीस भाषणासाठी उभे राहिले आणि त्यांनी संजय शिरसाटांच्या वक्तव्यावर स्पष्टीकरण दिले. ते म्हणाले, हो, ती खोली पाडणार आहोत, पण यामागे आकस नाही, तर नव्या इमारतीचे काम आहे. संजय शिरसाटांनी अर्धसत्य सांगितले आहे. विधी महाविद्यालयासाठी नव्या इमारतीची गरज आहे, म्हणून मी ते बोललो.

या टोलेबाजीनंतर व्यासपीठावरच वातावरण काहीसे संमिश्र होते. पण पुढे मुख्यमंत्री फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी हे काम कोणत्याही एका विभागाचे नसून सर्व विभागांच्या सहभागातून झाले असल्याचे नमूद करत परिस्थिती मवाळ करण्याचा प्रयत्न केला.

या घटनाक्रमावरून महायुतीतील अंतर्गत संघर्ष पुन्हा एकदा उघड झाला आहे. सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या जाहीर कार्यक्रमातच एकमेकांवर टोलेबाजी केली जात असल्यामुळे श्रेयवादाचा विषय केवळ अंतर्गत बैठकीपुरताच सीमित न राहता, तो जनतेसमोर उघडपणे येऊ लागला आहे.

## हिंदी सक्ती हा भाजप, आरएसएस चा अजेंडा : हर्षवर्धन सपकाळ



**मुंबई :** राज्यात पहिलीपासून हिंदीची सक्ती करण्याचा निर्णय हा भाजप व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा अजेंडा व कुटिल डाव आहे. त्यांना अनुसूची ८ मधील सर्वच भाषा संपवून हिंदी ही एकमेव भाषा देशात ठेवायची आहे, असा आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी शनिवारी येथे पत्रकारांशी संवाद साधताना केला. गुजरातमध्ये पहिलीपासून हिंदीची सक्ती नाही, मग महाराष्ट्रातच का? असा सवालही त्यांनी या प्रकरणी उपस्थित केला आहे.

राज्यात पहिलीपासून हिंदी शिकवण्याच्या मुद्यावरून मोठे राजकारण तापले आहे. या प्रकरणी सरकार व विरोधकांत राजकीय चिखलफेक सुरू असल्याच्या पार्श्वभूमीवर हर्षवर्धन सपकाळ यांनी सत्ताधारी भाजप व राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर उपरोक्त आरोप केला आहे. काँग्रेस मागील एप्रिल महिन्यापासून हिंदी सक्तीचा शासन निर्णय रद्द करण्याची मागणी करत आहे. जनजागृती करत आहे. हा निर्णय राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व भाजपचा अजेंडा व कुटिल डाव आहे. त्यांना अनुसूची ८ मध्ये असणाऱ्या सर्व भाषा संपवायच्या आहेत. केवळ हिंदी हीच एकमेव भाषा त्यांना ठेवायची आहे.

हिंदीचा सन्मान व आदर आहे. पण हिंदीसोबत सर्वच मातृभाषा विशेषतः मराठीचे संवर्धन झाले पाहिजे. कारण मराठी ही आमची संस्कृती आहे, जीवनपद्धती आहे. ही जीवनपद्धती नेस्तनाबुत करण्याचा भाजपचा डाव हाणून पाडला पाहिजे. त्यामुळे देशातील सर्वच सुजाण नागरिकांनी याविरोधात भूमिका घेतली पाहिजे ही भूमिका आम्ही यापूर्वीच अधोरेखित केली आहे, असे ते म्हणाले.

ते पुढे म्हणाले, मी हिंदीच्या सक्तीच्या मुद्यावर साहित्यिकांना पत्र लिहून आवाहन केले आहे. आता काहीजण मोर्चा काढत आहेत. हिंदी सक्तीचा निर्णय रद्द करावा हीच सर्वांची दिशा आहे. हा संस्कृतीचा लढा आहे. त्यासाठी सर्वांनी पुढे येऊन लढले पाहिजे. या प्रकरणी कुणाचा फोन किंवा निमंत्रण आले का? हा महत्त्वाचा प्रश्न आहे. आम्ही पहिलीपासून हिंदीची सक्ती करण्याविरोधात लढत आहोत हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या गुजरातमध्ये हिंदीची सक्ती नाही. मग महाराष्ट्रात पहिलीपासून हिंदी कशासाठी? गुजरातमध्ये एक धोरण व महाराष्ट्रात दुसरे धोरण का? हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट करावे. हा भाजपचा दुटप्पीपणा आहे. गोळवलकर यांच्या बंच ऑफ थॉटवरही या नेत्यांनी आपली भूमिका स्पष्ट करावी, असेही हर्षवर्धन सपकाळ यावेळी बोलताना म्हणाले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २९ जून २०२५


## सेन्ट्रल सेक्टर स्कॉलरशिप प्राप्त विद्यार्थ्यांचा अभिनंदन सोहळा संपन्न




**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महाविद्यालयाच्या तीस विद्यार्थ्यांना सेन्ट्रल सेक्टर स्काॅलरशिप मिळाली आहे. या सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार महाविद्यालयाच्या मल्टिपर्पज सभागृहात संपन्न झाला.

यावेळी मंचावर कार्यक्रमाच्या अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई, डॉ. मीनल श्रीगीरीवार, डॉ.अन्विता अग्रवाल, डॉ. शिला जीरे, पर्यवेक्षक माधुरी भावसार आदींची उपस्थिती होती. प्रारंभी प्रा. शंकर विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली अमृता गायके, मधु वैष्णव, राधिका दैठणकर, भार्गवी मोदी या विद्यार्थीनीनी स्वागत गीत गायले. सेन्ट्रल सेक्टर स्कॉलरशिप प्राप्त विद्यार्थ्यांचा प्राध्यापकांचे हस्ते रोप देऊन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी विद्या गादिया, लक्ष्मी ओंकार, उन्नती उमरकर, गणेश कोरडे, मैथिली वाळगावकर इत्यादी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई आपल्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी म्हणाल्या की प्रत्येकाने झाडे लावली पाहिजेत आणि ती जगवली पाहिजे.

नाहीतर पाणी बाॅटल ज्याप्रमाणे आपल्याला प्रवासात घेऊन जावे लागते त्याप्रमाणे भविष्यातही आपल्याला ऑक्सिजन घेऊन फिरावे लागेल. तसेच विद्यार्थ्यांनी केलेल्या मेहनतीचे कौतुक केले.

यापुढेही असेच मेहनत करा, यशस्वी व्हा. असा मोलाचा संदेश दिला. प्रास्ताविक माधुरी भावसार यांनी केले तर सुत्रसंचलन प्रा. ज्योती मंठाळकर व आभार डॉ. शीला जीरे यांनी मानले. यावेळी मोठ्या संख्येने प्राध्यापक, विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

## राजर्षी शाहु महाराजांची जयंती साजरी



**(मुरुम) प्रा. सुधीर पंचगल्ले :** येथील श्री.छत्रपती शिवाजी महाविद्यालयात दि.२६ जून २०२५ रोजी महाविद्यालयाच्या एनसीसी विभागाच्या वतीने राजर्षी शाहु महाराज यांच्या जयंती निमित्त सामाजिक न्याय दिन साजरा करण्यात आला.

सर्वप्रथम प्राचार्य डॉ संजय अस्वले यांच्या हस्ते राजर्षी शाहु महाराजाच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले नंतर एनसीसी विभागाच्या वतीने महाविद्यालयापासून बसस्थानका पर्यंत सामाजिक ऐक्याचे घोषणा देत रॅली काढण्यात आली.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ संजय अस्वले सरांनी राजर्षी शाहु महाराजांच्या जीवनाचा आदर्श सर्वांनी घ्यावा असे सांगितले त्यांनी केलेले सार्वजनिक, सामाजिक, शैक्षणिक, बहुजन, अस्पृश्यता, मागास, दुर्बल, महिला, शेतकरी, मजूर, विद्यार्थी यांच्यासाठी संपूर्ण आयुष्य घातले त्यामुळेच आज त्यांची सामाजिक सुधारणावादी दृष्टिकोण दिसुन येतो आणि त्यांच्याच कार्याची दखल घेऊन आज संपूर्ण महाराष्ट्रात सामाजिक न्याय दिन म्हणुन साजरा करण्यात येत आहे हे त्यांच्या कार्याची पावती आहे असे सरांनी सांगितले.

यावेळी डॉ विलास इंगळे डॉ.पद्माकर पिटले, डॉ. विनोद देवरकर, डॉ. अशोक पदमपले, प्रा. शैलेश महामुनी, प्रा. एम. डी. साळुंखे, प्रा. मुरली जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ भरत शेळके यांनी तर आभार डॉ पी एल सावंत यांनी मानले.या कार्यक्रमाला प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षकेत्तर कर्मचारी, एनसीसी कॅडेट व विद्यार्थी उपस्थित होते.







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २९ जून २०२५


## ठाकरे बंधूंच्या मोर्चात अजित पवार गट सहभागी होणार नाही : सुनील तटकरे



**मुंबई** : हिंदी सक्तीच्या विरोधात ठाकरे बंधूंच्या वतीने 5 जुलै रोजी मुंबई भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चाला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाने पाठिंबा दिला असून, मोर्चात सहभागी होणार आहेत. या मोर्चाला राष्ट्रवादी अजित पवार गट पाठिंबा देणार का? पक्षाची नेमकी भूमिका काय आहे? याबाबत राजकीय वर्तुळात उत्सुकता होती. यावर आता राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी प्रतिक्रिया दिली असून, या मोर्चात आमच्या पक्षाचा कोणताही नेता सहभागी होणार नसल्याचे स्पष्ट केले आहे.

राज्यात पहिलीपासून हिंदी शिकवण्याच्या मुद्यावरून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. विरोधक हिंदी सक्तीला विरोध करत असून, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील पहिली, दुसरी, तिसरी आणि चौथी या वर्गात हिंदी असू नये. पाचवीपासून हिंदी असावी. पहिलीपासून मुलांना मराठी शिकवावे, त्यांना मराठी लिहिता, वाचता यावे, अशी स्पष्ट भूमिका मांडली होती. त्यामुळे 5 जुलैच्या मोर्चात अजित पवारांचा पक्ष देखील सहभागी होणार का? अशी चर्चा सुरू झाली होती. त्यावर आता सुनील तटकरे यांनी स्पष्ट विधान केले आहे.

5 जुलैच्या मोर्चात आमच्या पक्षाचा कोणताही नेता सहभागी होणार नाही, असे सुनील तटकरे यांनी स्पष्ट केले आहे. हा विरोधकांचा मोर्चा आहे. त्यामुळे आमच्या पक्षाला जर या विषयावर काही मांडायचे असेल, तर आम्ही मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांसोबत चर्चा करून तो मार्ग शोधू, असेही ते म्हणालेत.

शरद पवार यांच्या पक्षाने या मोर्चाला पाठिंबा दिला आहे. याबाबत सुनील तटकरे यांना विचारले असता, मला याबाबत काहीच बोलण्याचे कारण नाही, राज्यातल्या निवडणुका महायुती म्हणूनच लढण्याचे ठरले आहे. असे असताना जर का कोणाला काही वेगळा निर्णय घ्यायचा असेल तर ते स्वतंत्र आहेत, त्यामुळे आम्ही त्याच्यामध्ये हस्तक्षेप करणार नाही. आम्हाला ज्या पद्धतीने निवडणुकीला सामोरे जायचं आहे, त्या पद्धतीने आम्ही सामोरे जाऊ, असे त्यांनी म्हटले.

5 जुलैच्या मोर्चामुळे मराठी मतांचे ध्रुवीकरण होऊन महायुतीला फटका बसेल का? असा प्रश्न विचारला असता तटकरे म्हणाले, मी या मोर्चाकडे राजकीय चष्म्यातून बघत नाही. लोकशाहीत प्रत्येकाला आंदोलन करण्याचा अधिकार आहे. मात्र, या मोर्चामुळे राजकीय समीकरणे फारशी बदलणार नाहीत, असे मला वाटते.






## पालिकेच्या निवडणुका नसत्या तर इतका विरोध झाला नसता : मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई** : पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना तृतीय भाषा म्हणून हिंदी शिकवण्याच्या मुद्यावरून काढण्यात येत असलेल्या मोर्चावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टीका केली आहे. ही केवळ राजकीय भूमिका आहे असे मी म्हणणार नाही. कोणाच्याही समोर प्रश्नचिन्ह निर्माण करणार नाही. मात्र महानगरपालिकेच्या निवडणुका नसत्या तर कदाचित इतका वेगळ्या पद्धतीने विरोध झाला नसता. असा दावा फडणवीस यांनी केला आहे.

मनसे प्रमुख राज ठाकरे हे माझे चांगले मित्र आहेत. म्हणून काय झाले? मात्र त्यांच्या काही भूमिका आहेत. तर माझ्या काही भूमिका आहेत. सर्वांच्या सारख्या भूमिका असत्या तर सर्व एका पक्षात राहिले असते. त्यामुळे भूमिका वेगळ्या असू शकतात. मात्र उद्धव ठाकरे यांनी जर एखादा रिपोर्ट स्वीकारला आणि आता त्याच्या विरोधात ते बोलताय, तर याचा अर्थ केवळ राजकीयच आहे. या राज्यात माशेलकर, मुणगेकर, सुखदेव थोरात यांच्यासारख्या लोकांवर प्रश्नचिन्ह लावता येईल का? असा प्रतिप्रश्न फडणवीस यांनी विचारला आहे.

देवेंद्र फडणवीस यांना राजकारण करायचय, त्यामुळे देवेंद्र फडणवीस काहीतरी करतोय. मात्र या लोकांना देखील राजकारण करायचे आहे का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. अशा लोकांनी जर एखादा रिपोर्ट दिला आणि तो तुम्ही स्वीकारला आहे. आता तुम्ही त्यालाच विरोध करता? याचा अर्थ मराठीचा प्रेम नाही तर राजकारण असल्याचा स्पष्ट आरोप देखील फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या निर्णयामागचे कारणही सांगितले. यामागे एक सायंटिफिक प्रोसेस आहे. या प्रोसेस मध्ये आपले विद्यार्थी पुढे कसे गेले पाहिजे, या दृष्टिकोनातून तयार केलेले त्रिभाषा सूत्र आहे. ते तयार करत असताना विद्यार्थ्यांची बुद्धी सर्वात जास्त कधी चालते, भाषा शिकण्याची शक्यता कधी अधिक असते. या संदर्भातले रिसर्च करून त्या कालावधीमध्ये त्यांना भाषा शिकवल्या तर ते अधिकच्या भाषा शिकू शकतात, अशा प्रकारचा मुद्दा समोर आला. हा आमच्यासाठी प्रतिष्ठेचा विषय नाही. कुठलीही भाषा शिका, हिंदीच शिकली पाहिजे असे नाही. हे आम्ही एका मिनिटात सांगितले. हिंदी सक्तीला यांचा विरोध नाही तर यांचा विरोध केवळ हिंदीला आहे. भारतामध्ये तुम्हाला इंग्रजी चालते, तीला तुमचा विरोध नाही. परकीय भाषा चालते मग भारतीय हिंदी का चालत नाही? असा प्रश्न देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित केला.

मराठी आणि हिंदी कॉम्पिटिशन झाली तर पहिली मराठीच निवडली जाईल. मराठी सोबत कोणतीही कॉम्पिटिशन नाही. मात्र त्याचवेळी आमच्या मुलांना तीन भाषा शिकायच्या आहे. तीन भाषा शिकले नाही तर नवीन शैक्षणिक धोरणाप्रमाणे क्रेडिट मिळणार नाही. नवीन भाषा न शिकल्यामुळे मराठी विद्यार्थ्यांचे क्रेडिट कमी होणार आहे. त्यामुळे चांगले मार्क घेऊन देखील राष्ट्रीय पातळीवरील संस्थांमध्ये मराठी विद्यार्थ्यांचा नंबर लागणार नाही. हे मराठी भाषिक विद्यार्थ्यांना मागे ओढण्यासारखे आहे.

राज्यातील संस्थांमध्ये ॲडमिशन तुम्ही ठरवाल. मात्र राष्ट्रीय पातळीवरील संस्थांमध्ये सर्व निवड सिईटीने होत आहे. यात आपण मराठी मुलांचे नुकसान करत असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. हा मुद्दा भावनेपेक्षा वस्तुस्थिती समजून घ्यायचा आहे, असे आवाहन देखील त्यांनी केले. सत्तेत असताना वस्तुस्थिती समजून घ्यायची, कमिटी तयार करायची, त्यांचा रिपोर्ट स्विकारायचा, आणि विरोधी पक्षात गेल्यानंतर भूमिका बदलायची? अशा शब्दात विविध फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला आहे.

महाराष्ट्रातील काही विद्वानांनी गुजरातमध्ये तिसरी भाषा शिकवली जाते का? यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. मात्र, गुजरात राज्यामध्ये देखील तिसऱ्या वर्गापासून हिंदी भाषा शिकवली जात आहे. हिंदीला त्यांनी संस्कृत आणि इतर भाषांचे देखील पर्याय दिलेले आहेत. असे म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी भाषेवरून गुजरातकडे बोट दाखवणाऱ्या नेत्यांना देखील प्रत्युत्तर दिले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २९ जून २०२५


# ८० लाखांचा निधी मंजूर, काम सुरू... तरी इमारत पाडलीच!

## प्रशांत ढोरे पाटील यांचा प्रशासनावर घणाघात



**चिखली (महेश मुंढे) :** "कोणत्या दैवी शक्तीच्या इशाऱ्यावर घेतला निर्णय? सत्तेचा गैरवापर करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करा!"चिखली येथिल स्थानिक ब्रिटिशकालीन ऐतिहासिक विश्रामगृहाच्या अचानक पाडकामावरून आता शहरात खळबळ उडाली असून, या प्रकरणावर हॅपीनेस काउंसल्टंट प्रशांत ढोरे पाटील यांनी थेट प्रशासनाला जाब विचारत घणाघाती टीका केली आहे.

"८० लाखांचा निधी मंजूर झाला, काम सुरू झालं... आणि नंतर अचानक निर्णय बदलून रातोरात इमारत पाडली जाते? हे सगळं कोणाच्या वरदस्तामुळे चाललं आहे?" असा थेट सवाल त्यांनी केला आहे.

अधिकाऱ्यांच्या मनमानीवर थेट प्रहार"ही कोणती योजना जी मंजूरही होते, अंदाजपत्रकही तयार होतं, कामही सुरू होतं आणि नंतर एक निर्णय घेऊन सगळी रचना उद्ध्वस्त केली जाते? हे फक्त अपयश नव्हे — हा जनतेच्या पैशांवरचा विश्वासघात आहे." असं म्हणत त्यांनी यामागे सत्ताधाऱ्यांचं छुपं पाठबळ



असल्याचा गंभीर आरोप केला. चौकशी आणि गुन्हे दाखल करण्याची मागणीप्रशांत ढोरे पाटील यांनी मागणी केली की, "या संपूर्ण प्रकाराची न्यायालयीन चौकशी झालीच पाहिजे.

निर्णय घेणाऱ्या अधिकाऱ्यांवर आणि त्यांच्या पाठीराख्यांवर तत्काळ गुन्हे दाखल व्हावेत.आणि जर कोणी राजकीय वरदहस्तामुळे हे घडवून आणलं असेल, तर त्याच्या मुळाशी जाऊन जनतेपुढे सत्य मांडलं गेलं पाहिजे."

"ही लढाई फक्त इमारतीसाठी नाही, लोकशाहीसाठी आहे""ब्रिटिशकालीन वास्तू म्हणजे केवळ जुनं बांधकाम नव्हे, ती शहराच्या सांस्कृतिक स्मृतींचा भाग होती.

ती पाडण्यामागचा हेतू संशयास्पद असून, अधिकाऱ्यांनी स्वत:ला ठेकेदारांचे दलाल समजण्याची गरज नाही," अशी खरमरीत टीका पाटील यांनी केली.जनतेच्या पैशांचा विनाश — आणि कोणीच उत्तरदायी नाही?प्रशांत पाटील म्हणाले, "जनतेच्या पैशांची चेष्टा करणाऱ्यांची नावे आणि त्यामागचे 'शहाणे डोके' शोधून काढा.

आज एखाद्या अधिकाऱ्याचा किंवा राजकीय दबावाचा वापर करून रातोरात इमारत पाडली जाते, तर उद्या संपूर्ण शहरच विकलं जाईल — हीच खरी चिंता आहे."पारदर्शक चौकशी न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा"जर हे प्रकरण थांबवलं नाही, आणि दोषींवर कारवाई झाली नाही, तर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल," असा स्पष्ट इशारा प्रशांत ढोरे पाटील यांनी दिला आहे.

# काळ मोठा कठीण आला आहे

काळ तर फार मोठा
कठीण आला आहे
जगावे की मरावे ?
माणूस हैराण झाला आहे

तरुणांना रोजगार नाही
सरकारी नोकऱ्या बंद
महागाईने तर कंबरडे मोडले
माणसांचे मरण स्वस्त झाले आहे

सरकारी शाळा बंद
सगळ्या क्षेत्रात खाजगीकरणाचे पेव
आरक्षणही बंद करण्याचा त्यांचा डाव
आम्ही मात्र वर्गीकरणासाठी भांडत आहोत

जातीयता, धर्मांधता आणि भ्रष्टाचार
बेलगामपणे वाढत आहे
ऑपरेशन 'सिंदूर' च्या नावाखाली
आमच्या कैक भगिनी विधवा होत आहेत

जिकडे तिकडे चोहीकडे
खुन, मारामाऱ्या, बलात्कार
कायद्याचा कसलाच धाक नाही
गुन्हेगारी काही केल्या कमी होत नाही

राजकारण, शासन, अधिकारी फारच वाईट
नैतिकता त्यांच्यांत कुठेच दिसत नाही
देश त्यांच्या ताब्यात /हातात
जनतेला कैद्यासारखे वागवले जात आहे

सरकारवर टीका करायची सोय नाही
महाराष्ट्र जनसुरक्षा कायदा येत आहे
लोकशाही, व्यक्ती स्वातंत्र्य कुठंय ?
इथे तर हुकूमशाही नांदताना दिसत आहे

बाहेर पडलेला माणूस
घरी सुखरूप येईल अशी शाश्वती नाही
सरकार देवाधर्मासाठी बक्कळ निधी देतं
मानवी कल्याणासाठी मात्र काही नाही

राज्यघटनेतील धर्मनिरपेक्ष, समाजवादी शब्द
काढून टाकायला निघाले आहेत
म्हणे संविधान घरोघरी
रोज तर मोडीत काढीत आहेत

ज्ञानपीठापेक्षा ....
शक्तिपीठाचा निधी जोरात आहे
माणसांना अज्ञानाच्या अंधकारात ठेवणं
हेच सरकारचं खरं धोरण आहे

आता सगळ्यांनी जागं होणं
काळाची गरज आहे
साप निघून गेल्यास
भुई बडवण्यात काय अर्थ आहे


**प्रा. डॉ. सतीश मस्के,**
**पिंपळनेर, धुळे**
**मो. +९१ ७५०७५०४०४६**








# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २९ जून २०२५


## मिटमिटा येथे द बर्निंग स्कूटर, शिवसेना उपजिल्हा प्रमुख संतोष आमले यांच्या प्रसंगावधानाने वाचला दोन जणांचा जीव





**मिटमिटा (प्रा. शिवाजी गायकवाड) :** येथे दिनांक 27 जुलै रोजी सायंकाळी 6:30 च्या सुमारास एम एच २० जी टी 2337 या दुचाकी स्कुटीने पेट घेतला या गाडीवर दोन व्यक्तीं होत्या त्यांचा जीव वाचवण्यात यश मिळाले असून थोडक्यात जीवित हानी टळली आहे.

सदर दुचाकी खुलताबादकडून छत्रपती संभाजी नगरकडे येत असतांना मिटमिटा येथिल मिडोज हॉटेल जवळ आल्यावर या दुचाकी स्कुटीने अचानक पेट घेतला. यावर दोन व्यक्ती होत्या.

शिवसेना उपजिल्हा प्रमुख संतोष आमले हे येथून पडेगावकडे येत होते त्यांनी सदर दुचाकी चालक व मागे बसलेल्या युवकांना ताबडतोब गाडी थांबून सदर स्वतः चा जीव धोक्यात घालून या तरुणांना वाचवले व मनपाच्या अग्निशमन विभागाला या घटनेची माहिती दिली.

अग्निशमन विभागाचा अग्निबंब ताबडतोब घटनास्थळी दाखल झाला व आग आटोक्यात आली तोपर्यंत गाडी पूर्णतः जळूला खाक झाली होती.त्यामुळे संतोष आमले यांचे रस्त्याने येणारे जाणाऱ्यांनी आभार मानत अभिनंदन केले. घटनास्थळी बघ्यांची गर्दी झाली होती. आग विझेपर्यंत रस्त्याच्या दुतरफा गाड्यांची दुरपर्यंत रांगा लागल्या होत्या.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स अँड प्रिंटर्स**

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com


## कन्नड खरेदी विक्री संघावर शिवशाही शेतकरी विकास पॅनल चे वर्चस्व




**कन्नड (अरुण थोरात):** कन्नड तालुका शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघाच्या दि. २८ जून रोजी झालेल्या निवडणूकीत आ. सं◌ंजनाताई जाधव, शिवसेना जिल्हाप्रमुख भरतसिंग राजपूत, बाजार समिती सभापती श्री राठोड , उपसभापती जयेश बोरसे यांच्या नेतृत्वातील 'शिवशाही शेतकरी विकास पॅनल' ने सर्व १५ जागा जिंकून वर्चस्व मिळवित सत्तांतर घडविले आहे.

प्रतिस्पर्धी तालुक्यातील दिग्गज नेत्याऔच्या 'शेतकरी विकास पॅनल' एक ही जागा मिळविता आली नाही.मतमोजणी अखेर शिवशाही पॅनल चे पुढील उमेदवार विजयी झालेत. सहकारी संस्था प्रतिनिधी:- रंगनाथ पुंजाबा आल्हाड, भगवान मुकुंदा कांदे, राजकुमार हंसराज गंगवाल, रामेश्वर माधवराव घनकर, ज्ञानेश्वर आण्णा निकम, आकाश शिवाजीराव बोलधने, प्रविण इंदरचंद राठोड, वैयक्तिक सभासद प्रतिनिधी:- अब्दुल वहाब अब्दुल असद, निरंजन योगेश्वराव चव्हाण, आप्पासाहेब कचरु जाधव, वि.जा. भ.ज. विमाप्र :- प्रकाश दल सिंग राजपूत, अनु.जाती जमाती: लक्ष्मण सांडू साठे, महिला राखीव:- मिनाबाई बन्सिधर निकम, सुनिता उल्हास मालोदे, इतर मागासवर्ग:- प्रताप मोतिराम गुजरहे विजयी झालेत. निवडणूक निकाल जाहीर होतात समर्थक, कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. कृषी उत्पन्न बाजार समिती नंतर खरेदी विक्री संघाला विशेष महत्व असल्याने या निवडणूकी कडे तालुक्याचे लक्ष लागले होते. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीवर याचा परिणाम जाणवू शकतो असे राजकीय जाणकारांचे मत आहे.